
अंत ना आरंभ
आसावरी काकडे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# अंत ना आरंभ

## आसावरी काकडे

# अंत ना आरंभ

लेखिका : आसावरी काकडे
‘सेतू’ डी १/३, स्टेटबँकनगर, कर्वेनगर, पुणे, ४११०५२ .
फोन नं. ९४२१६७८४८० / ९७६२२०९०२८
Email- asavarikakade@gmail.com
Blog- asavarikakade.blogspot.com

मुखपृष्ठ छायाचित्र: आसावरी काकडे

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp: 9987737237

प्रकाशन : ३१ डिसेंबर २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**आसावरी श्रीनिवास काकडे**

**बी.कॉम., एम.ए. मराठी,**

**एम.ए. तत्त्वज्ञान**



**प्रकाशित पुस्तके-**

**गद्यलेखन-**

*‘कवितेभोवतीचं अवकाश’ (लेखसंग्रह)

*ईशावस्यम् इदं सर्वम्: एक आकलन-प्रवास’ (तत्त्वज्ञान)

* ‘अथांग’- (अनुवादित कादंबरी) बिन्द्या सुब्बा यांच्या ‘अथाह’ या साहित्य अकादेमी पुरस्कार प्राप्त मूळ नेपाळी कादंबरीचा मराठी अनुवाद.

* आनंदी गोपाळ (कादंबरी- संक्षिप्त आवृत्ती) श्री. ज. जोशी यांच्या आनंदी गोपाळ या कादंबरीचे मुलांसाठी संक्षिप्तीकरण

**कवितासंग्रह-**

मराठी- ९ :

‘आरसा’, ‘आकाश’, ‘लाहो’, ‘मी एक दर्शनबिंदू’, ‘रहाटाला पुन्हा गती दिलीय मी’, ‘स्त्री असण्याचा अर्थ’, ‘उत्तरार्ध’, ‘व्यक्त-अव्यक्ताच्या मध्यसीमेवर’ आणि ‘भेटे नवी राई’

हिन्दी- ३

‘मौन क्षणों का अनुवाद’, ‘इसीलिए शायद’, आणि ‘मेरे हिस्से की यात्रा’- (स्वतःच्या निवडक मराठी कवितांचा हिन्दी अनुवाद. या हिंदी अनुवादाचा तमिल अनुवाद प्रकाशित झाला आहे.)

अनुवादित- ४

* ‘बोल माधवी’ (चन्द्रप्रकाश देवल यांच्या ‘बोलो माधवी’ या हिन्दी कवितासंग्रहाचा अनुवाद),

* ‘तरीही काही बाकी राहील’ (विश्वनाथ प्रसाद तिवारी यांच्या निवडक हिन्दी कवितांचा अनुवाद),

* ‘लम्हा लम्हा’ (दीप्ति नवल यांच्या ‘लम्हा लम्हा’ या कवितासंग्रहाचा अनुवाद),

* ‘तू लिही कविता’ (डॉ. दामोदर खडसे यांच्या ‘तुम लिखो कविता’ या कवितासंग्रहाचा अनुवाद)

बालगीतसंग्रह- ५ : ‘टिक टॉक ट्रिंग’, ‘अनु मनु शिरू’, ‘जंगल जंगल जंगलात काय?’(इसाप गाणी), ‘भिंगोऱ्या भिंग’, आणि ‘ऋतुचक्र’

ब्लॉग्ज- ‘ब्लॉग, एक नवी सुरुवात’ या ब्लॉगमधे विषयानुसार बनवलेले दहा ब्लॉग्ज एकत्रित.

(http://www.asavarikakade.blogspot.com)

## काही महत्त्वाचे पुरस्कार-

* ‘बोल माधवी’- साहित्य अकादेमी, नवी दिल्लीचा अनुवाद पुरस्कार २००६

* ‘इसीलिए शायद’- केंद्रीय हिंदी निदेशालय, नवी दिल्लीचा ‘हिंदीतर भाषी हिंदी लेखक पुरस्कार

* ‘मेरे हिस्से की यात्रा’- महाराष्ट्र राज्य हिन्दी साहित्य अकादमीचा संत नामदेव पुरस्कार

* ‘आरसा’ आणि ‘मी एक दर्शनबिन्दू’ या संग्रहांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार

* बालसाहित्यासाठी औरंगाबादच्या परिवर्तन संस्थेचा कै. ग.ह. पाटील पुरस्कार

* ‘कवितेभोवतीचं अवकाश’- आचार्य अत्रे स्मृति प्रतिष्ठान केशवकुमार आचार्य अत्रे पुरस्कार

* ‘ईशावस्यम् इदं सर्वम्...’- सार्वजनिक वाचनालय, नाशिकचा ग. वि. अकोलकर पुरस्कार.

* एकूण लेखनासाठी गो. नी.दांडेकर स्मृति ‘मृण्मयी’ पुरस्कार,

* पुणे मराठी ग्रंथालय, पुणेचा साहित्य सम्राट न. चिं. केळकर पुरस्कार

**इतर सन्मान**

* इयत्ता सातवी ते एम. ए. पर्यंतच्या विविध वर्गांच्या अभ्यासक्रमात व विविध संपादित संग्रहांमधे वरील संग्रहांमधील कवितांचा समावेश.

* आकाशवाणी, नवी दिल्ली तर्फे आयोजित सर्वभाषी कविसंमेलनात(२००२) मराठीचे प्रतिनिधित्व

* हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग (अलाहाबाद) द्वारा 'सम्मेलन सम्मान'- २००४

* अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासह अनेक महत्त्वाच्या साहित्यिक कार्यक्रमांमधे कवितावाचन, निबंधवाचन, भाषण अशा प्रकारचा सहभाग.

## प्रकाशक म्हणून...

वर्षारंभ म्हणजे इतर दिवसांसारखाच एक दिवस असतो हे जरी खरं तरी त्या दिवशी एक वेगळी हुरहुर व उत्सुकता निःशब्दावस्थेत असते. हे नेमक्या शब्दांत आणि सखोल चिंतनातून मांडणारा आसावरीताईंचा एक लेख वाचनात आला. ई साहित्यच्या नव्या वर्षाची सुरुवात अशा काही चिंतनाने व्हावी असे वाटले. आसावरीताईंचे गद्यही काव्यात्म असतेच पण त्याही पलिकडे जाऊन वाचकाला चिंतन करायला लावणारे असते. त्यांचे काव्य व गद्यही फटाक्यांच्या माळेच्या वातीसारखे असते. ते वाचल्यावर वाचक पुढेही विचारशील रहातो. तेव्हा वाचकांना वर्षारंभी हे असे चिंतनीय काही द्यावे या उद्देशाने आसावरीताईंकडे विनंती केली. कसलेही आढेवेढे न घेता त्यांनी विनंतीला मान दिला.

ई साहित्य हे नवोदित साहित्यिकांसाठी व्यासपीठ आहे. बहुतांश लेखक नवखे असतात. "यांच्या पंक्तीला कसे बसू?" असे आसावरीताईंच्या मनातही आले नाही हे त्यांचे इतर मोठ्यांहूनही मोठेपण आहे. त्यांच्या या मोठेपणाचे रहस्य त्यांच्या चिंतनात व त्यांनी आजवर पचवलेल्या तत्त्वज्ञानात आहे. या मोठे-पणाचा अंश तुम्हा आम्हा सर्वांना लाभो ही नववर्षाची शुभेच्छा.

सुनीळ सामंत, टीम ई साहित्य.

# अंत ना आरंभ

आसावरी काकडे

**“उपजे ते नाशे ।**
**नाशले पुनरपि दिसे ।**
**हे घटिकायंत्र तैसे ।**
**परिभ्रमे गा”**

**-संत ज्ञानेश्वर**

# अनुक्रम

**काही थांबत नाही... काही संपत नाही... १३**

**तरीही काही बाकी राहील... २५**

**नव्या संकल्पाची ती आठवण... ३५**

**समारोप नसतोच... ३८**

*वरील चारही लेख २०१२ ते २०१८ यातील वेगवेगळ्या वर्षांच्या अंती लिहिलेले व विविध वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेले आहेत.*

*या वृत्तपत्रांचे आम्ही आभारी आहोत.*

# काही थांबत नाही... काही संपत नाही...

२०१४- नव्या वर्षाचं कॅलेंडर विकत घ्या म्हणून एक मुलगा सकाळी सकाळी घरी आला. कॅलेंडर तर हवंच होतं. घेतलं आणि कॅलेंडरची ती सुरनळी कपाटात ठेऊन दिली. मनात वर्षाखेरीच्या कामांची गर्दी होती. आवरून लवकर बाहेर पडायचं होतं. पण त्या व्यग्रतेत नव्या वर्षाच्या चाहुलीनं अलगद प्रवेश केला... वर्षाखेरीच्या संधीकालात वर्षारंभाची पहाट डोकावली. सकाळी तो मुलगा कॅलेंडर घेऊन येईपर्यंत मनात वर्षाखेरीच्या विचारांची गजबज होती. आता त्यात वर्षारंभाच्या विचारांची धून ऐकू येऊ लागली...

अखंड काळाचा एक असा बिंदू ज्याला दोन्हीपैकी कोणतही नावं देता येतं- वर्षाखेर किंवा वर्षारंभ.! वाटून गेलं की ही दोन नावं आहेत आणि दोन दृष्टिकोनही.. याच विचारांच्या नादात घाईघाईत बाहेर पडले.

रस्त्याच्या बाजूला साचलेल्या गढूळ पाण्यात एक कावळा आपली चोच साफ करून घेत पाणी पीत होता. डास, माशा,

आणखी काही कृमी-कीटकही असतील त्याच्या भोवती... हे तसं अगदी सामान्य दृश्य.. कुणालाही, कुठेही, केव्हाही दिसू शकेल असं. मलाही दिसलं असेल बऱ्याचदा. पण कसं कोणजाणे आज त्या दृश्यानं माझं लक्ष वेधून घेतलं. डोळ्यांसमोर तरळत राहिलं बराच वेळ. एरव्ही कपाळावर आठ्या पाडणारं हे दृश्य. पण आज त्यानं मला वेगळंच काही जाणवून दिलं. मनात आलं कोणतीही जागा 'रिकामी' असत नाही. त्यातलं काही वाया जात नाही. उलट कुणाची तरी अगदी तातडीची गरज भागवू शकतं. कुणाचं तरी 'जीवन' असू शकतं. अशी कोणतीही क्षुल्लक वाटणारी 'घटना'ही विनाकारण असत नाही... विचार करता करता त्या दृश्याचं बोट सोडून जाणीव अंतर्मुख झाली. तिला स्फुरलं-



"कोई भी जगह खाली नहीं होती
कोई भी चीज बेवजह नहीं होती
हर चीज का कुछ न कुछ मकसद होता है
जीने का अपना अपना अंदाज होता है..!"

रस्त्याच्या कडेला साचलेल्या घाणेरड्या पाण्याकडे असंही पाहता येतं..! सौंदर्य केवळ वस्तूच्या बाह्य दिसण्यात असतं की त्याच्या असण्याच्या अनुच्चारित हेतूत, उपयोगितेत असतं? की याची दखल घेणाऱ्या नजरेत असतं? एखाद्या गोष्टीकडे अशा वेगळ्या नजरेनं पाहिलं तर ती किती अर्थपूर्ण आणि मग सुंदरही वाटू शकते ना?

काही वर्षांपूर्वी अगदी वेगळ्या जाणिवेतून एक कविता लिहिली होती. आजच्या विशेष मूडमधे ती मला त्यावेळेपेक्षा आणखी काहीतरी सांगू लागली..

‘‘जमिनीखालच्या अंधारात
असतात असंख्य रंगच्छटा
असंख्य आकार
कितीतरी स्वाद.. गंध
आणि वेगवेगळे स्पर्शही..!

खणून पाहिलं
तर आपल्याला दिसते
फक्त माती... दगड... पाणी..

पण मुळांना कळतं
कुठं काय आहे
आणि आपल्या झाडाला
काय हवं आहे...
ती निमूट अंधारात
पसरत राहतात
आईच्या उत्कटतेसारखी
आणि पुरवत राहतात झाडाला
रंग, गंध, आकार... हवं ते ते..!"

मानवी नजरेला जिथं फक्त दगड..माती..पाणी दिसतं तिथंच, माणसासारखी कोणतीही ज्ञानेंद्रीयं नसलेल्या मुळांना दिसतात रंग..आकार, उमगतो स्वाद..गंध आणि मुख्य म्हणजे कळतं की यातलं आपल्या झाडाला नेमकं काय हवं आहे..! बहरलेलं झाड पाहून आपण केवळ असा तर्क करू शकतो किंवा सूक्ष्म शास्त्रीय प्रयोगांनी हे जाणून घेऊ शकतो की जमिनीखालच्या अंधारात असतात रंग..आकार..स्वाद..गंध..स्पर्श असे सर्व गुणधर्म..! पण सामान्य नजरेला नाही दिसत यातलं काही. तिला दगड..मातीच दिसते. इतकंच नाही तर जे दिसतं त्यच्यापलिकडे इतकं अमर्याद, वैविध्यपूर्ण काही असू शकेल असा विचारही डोकावत नाही मनात..!

इथंही दोन पूर्ण वेगळे दृष्टिकोन. पण दर्शनबिंदू वेगळे, पाहण्याची क्षमता वेगळी, दिशा वेगळी.. आपापल्या जागी आपापल्या क्षमतेत होणारं एखाद्या 'घटने'विषयीचं आकलन किती कमालीचं भिन्न असतं ना? अशी एखादी घटना, एखादी वस्तू प्रत्येकाला जर वेगळी दिसत असेल तर मग ती 'स्वतः–in itself' असते तरी कशी? पाहणाऱ्या, जाणणाऱ्या प्रत्येक नजरेला दिसेल तशी? बहुरूपीणी? पण ही रूपं तर पाहणाऱ्याच्या नजरेत असतात. 'घटना', 'वस्तू' स्वतःहून काहीच असत नाही का? म्हणजे दृष्टिकोनावरच सर्व अवलंबून असतं की काय? Attitude is all that matters..! कुठेतरी वाचलेलं आठवलं.. अंतर्मुख मनानं मग याच दिशेनं भरारी घ्यायला सुरुवात केली. नेहमीच्या असंख्य गोष्टी नव्या दृष्टीला वेगळ्या दिसायला लागल्या. भोवतीचं भयंकर म्हणवलं जाणारं 'वास्तव' मनाआड होऊ शकत नव्हतं. तरी त्याच्याकडे पूर्ण वेगळ्या नजरेनं पाहता येईल असा भरोसा आतून उगवत होता..

पण कसं? लगेच दुसरं मन ओरडलं.. रोजचे काना-मनावर आदळणारे, घाबरवून सोडणारे प्रसंग चलचित्रासारखे डोळ्यांसमोर सरकू लागले. असंख्य उणीवा आणि दुर्घटनांच्या नोंदी अधोरेखित करणारे वृत्तपत्रांचे टाहो फोडणारे मथळे आणि समस्यांचे ऊग्र रूप

नजरेत खुपसणाऱ्या वाहिन्यांवरच्या घसाफोड चर्चा आठवल्या. त्या त्या वेळची कमालीची हताशता आठवली. सगळीकडून सतत अंगावर कोसळणाऱ्या असंख्य विपरितांचं ओझं एखादे दिवशी पृथ्वीचा तोल ढळवेल असं कुणीतरी कुठेतरी म्हटलेलं आठवलं.. कसं पहाणार याकडे वेगळ्या नजरेनं? कसं काय दिसणार त्यात काही भलं?..

आजचा चंगळवाद, त्याचं हरप्रकारे सतत होत राहणारं समर्थन, त्यासाठी होत असलेली निसर्गाची लयलूट... हे सर्व पाहून दूरदृष्टी असलेले विचारवंत भयंकर भविष्याचं चित्र रेखाटून समाजाला वेळीच सावध होण्याचा इशारा देत असतात... असंच चालू राहिलं तर भावी पिढ्यांसाठी आपण काय ठेवणार रखरखित माळरानाखेरीज? ना कुठे हिरवळ ना पाण्याचे झरे...निसर्गाची सर्व संपत्ती आपणच ओरबाडून घेणार आहोत का? निसर्ग श्रीमंत आहे. सर्वांच्या सर्व गरजा सहज भागवण्याइतका. पण तो माणसाची अमर्याद हाव नाही पुरवू शकणार...

हे सगळं तर बरोबरच आहे.. खूप महत्त्वाचं आहे. आज, आत्ता, इथे याचा विचार व्हायलाच हवा. सर्वांनी सतत सावध राहायला हवं. निसर्गाकडून भरभरून घेताना त्याला काही देत राहाणंही गरजेचं आहे. 'ज्ञान ते सांगतो पुन्हा' असं म्हणत प्राचिन

काळापासून परोपरीनं सांगितलं गेलेलं ज्ञान प्रत्येक काळातले आचार्य नव्या काळाच्या भाषेत पुन्हा पुन्हा सांगत राहतात... पण समाज ढिम्म बदलत नाहीए. सगळीकडे निराशाजनक चित्र आहे. माणसाची सर्व प्रकारची भूक पाशवी या विशेषणाला लाजवेल इतकी वाढत चालली आहे... अंतर्मुख होऊन विचार करणाऱ्या संवेदनशील मनाला सगळीकडून अंधारून आल्यासारखं वाटतं आहे. भोवतीच्या असंख्य घटितांमधे त्याला सकारात्मक, आशादायी काही दिसेनासंच झालं आहे...

हे सगळं आठवून क्षणभर मनात उगवू लागलेला भरोसा डळमळीत व्हायला लागला. सकाळपासूनचा प्रसन्न मूड झाकोळून जायला लागला. पण माझीच एक कविता धीर द्यायला धावून आली. दोन-तीन वर्षांपूर्वी स्वाईन फ्लूच्या साथीचं थैमान सुरू होतं. प्रत्येकजण जीव मुठीत घेऊन फिरत होता... त्यावेळी लिहिलेली ही कविता-

विषाणुओं का फैलाव
सुर्खियों में है आज-कल
दुनिया के उस कोने से इस कोने तक
छह महीनों में
पहुँच गया है फैलाव का प्रभाव

जानें जा रही हैं.. रोजाना एक-दो
दिल धडकता है
ये सब पढ़कर.. सुनकर..

पर मौसम है कि
अपनी जगह निभा रहा है
अपना काम वक्त पर..
वृक्षों पर बहार छाने लगी है..!
ऐसे कई वृक्ष होंगे
कई जगह बहार खिली होगी
कई जानें जनमती होंगी.. प्रतिक्षण एक-दो

लेकिन सृजन के इस फैलाव का
कोई जिक्र नहीं है सुर्खियों में
और दिल भी नहीं महकता
ऐसा कुछ देखकर.. सोचकर..!
***

खरंच.. एका बाजूला 'विनाश' आपलं काम चोख निभावत असताना सृजनाची ऊर्जा त्याच्या दुप्पट वेगानं कार्यरत झालेली असते. मात्र पायाखालच्या जमिनीच्या आधारासारखी ती गृहीत धरली जाते. त्याची 'बातमी' होत नाही. जे वेगळं आहे, क्वचित घडणारं आहे त्याची बातमी होते. पण त्याचमुळं चांगल्या,

सकारात्मक गोष्टी नेहमी दुर्लक्षित राहतात. आपणही ‘विनाशकारी’ बातम्या वाचून अस्वस्थ होतो. पण एखाद्या गृहीतासारखा सूर्य रोजच उगवतो म्हणून त्या सूर्योदयाच्या असीम सौंदर्याचा आनंद आपण रोज घेत नाही. निसर्गाची ओसंडून वाहणारी अमर्याद संपत्ती आणि निरामय आनंद देणारं सौंदर्य आपण खुशाल दुर्लक्षित ठेवतो. फार काय घरगुती प्रश्नानं खचून जाताना आपली प्रकृती ठणठणीत आहे याचा आनंद आपल्याला होत नाही. एखाद्या दुर्धर आजाराशी मुकाबला करताना आर्थिक स्थिती बरी असल्याचा दिलासा आपल्याला वाटत नाही. जे हातात नाही, जे आता वेदना देतंय त्याचं दुःख जे आहे त्याचा आनंद झाकोळून टाकतं नेहमी.. ‘वेगळा दृष्टिकोन’ अशा असंख्य दुर्लक्षितांकडे आपलं लक्ष वेधून घेऊ शकतो..!

आज वर्षारंभाच्या चाहुलीची धून मनात वाजत असताना उत्स्फूर्तपणे वाटत राहिलं की सगळ्याचा पूर्ण वेगळ्या तऱ्हेनं विचार करता येणं शक्य आहे... विनाशाच्या असंख्य रूपांना पराभूत करणारा सृजनाचा खेळ उघड्या डोळ्यांनी पाहता येईल. दुर्लक्षित राहणाऱ्या नेहमीच्या अनेक सकारात्मक गोष्टी जाणीवपूर्वक लक्षात घेता येतील- उदा. प्रत्येक पानगळीनंतर बहर येतो. रात्रीनंतर दिवस उगवतो. मृत्युचा पराभव करत रोज, दरक्षणी

नवे जीव जन्माला येतात... जीवन अनंत आहे. काही थांबत नाही. काही संपत नाही...

सामान्य मानवी मनाला जमिनीखालच्या अंधारात फक्त दगड..माती..पाणी दिसतं तसंच त्याला फक्त आज आत्ता इथे आहे तेवढंच, त्याच्या दृष्टिसमोर येईल तसंच दिसतं. त्याच्या सकारात्मक, प्रगल्भ नजरेला जास्तीत जास्त एवढंच उमगतं की 'जीवन अनंत आहे. काही थांबत नाही. काही संपत नाही...' मात्र काही महामानव द्रष्टे असतात. ते जाणू शकतात वर्तमान भूगोलाच्या पल्याडचं 'सत्य'. त्या प्रज्ञावंत ऋषींना आतून उमगलेलं 'तत्त्वज्ञान' त्यांनी नोंदवून ठेवलंय मंत्ररूपात-

**ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।**

**पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥**

आपण राहतो त्या विश्वाचं स्वरूप आहे तरी कसं? या मूलभूत प्रश्नाचं उपनिषद्कारांनी दिलेलं उत्तर म्हणजे हा शांतिमंत्र. 'तेही पूर्ण आहे, हेही पूर्ण आहे' म्हणजे दृश्य विश्वाची निर्मिती ज्यातून होते तेही पूर्ण आहे आणि निर्माण झालेलं विश्वही पूर्ण आहे. या पूर्णाचं वैशिष्ट्य असं की जे पूर्णातून निर्माण होतं ते तर पूर्ण असतंच पण त्या पूर्णातून हे पूर्ण काढून घेतलं तरी जे उरतं तेही पूर्ण असतं..!

खरंतर पूर्ण या संज्ञेच्या संदर्भात ते, हे असा भेद करता येत नाही. पण ही संकल्पना समजून घेताना अशी भाषा वापरावी लागते...

वर्षाखेरीची कामं उरकायला घाईघाईनं बाहेर पडलेल्या मला सकाळी सकाळी आलेल्या त्या मुलानं कॅलेंडरसोबत वर्षारंभाची आठवण दिली. तिचा हात धरून वाटभर झालेला विचारांचा प्रवास, 'ईशावास्य उपनिषदाच्या सुरुवातीला आणि शेवटी म्हटल्या जाणाऱ्या या महान शांतिमंत्रापर्यंत पोचला.. या मंत्राचा आशय अत्यंत मननीय आहे. यात एक दिलासा आहे की जे आहे ते अनंत आहे. न संपणारं आहे. पूर्ण आहे. नव्या वर्षात पदार्पण करताना त्याचा खोलार्थ समजून घेऊन त्याची व्याप्ती जाणून घेण्याची प्रेरणा सर्वांना मिळावी अशा शुभेच्छांसह या मंत्राचं मी केलेलं मराठी पद्यरूप स्पष्टीकरण खाली देत आहे-

**तेही पूर्ण आहे। हेही पूर्ण आहे। पूर्णात उगवे। तेही पूर्ण ॥**
**पूर्णाचे संपूर्ण। काढून घेतले। तरी उरतसे। पूर्णच ते..! ॥**

**पूर्ण इथे नाही। फक्त विशेषण। भाषेतली वीण। साधणारे ॥**
**पूर्ण ते आहे की। असते जे नित्य। आणि जे सर्वत्र। असतेच ॥**
**काल-अवकाश। व्यापून असते। उणे काय व्हावे। कशातून?॥**
**त्यातूनच जन्मे। विलीन त्यामध्ये। नाम-रूपामध्ये। प्रकटे जे ॥**
**पूर्णाहून काही। नाहीच वेगळे। जरी प्रकटते। भिन्नपणे ॥**

**पूर्णाच्या क्षितिजी। उगवे ते पूर्ण। मावळते पूर्ण। पूर्णामध्ये ॥**
**बीजातून एक। वृक्ष उगवतो। वृक्षांवर लक्ष। बीजे पुन्हा ॥**
**एक पूर्ण पेशी। निर्माण करून। मूळ पेशी पूर्ण। उरतसे ॥**
**तसे ते जगाला। जन्माला घालून। राहतसे पूर्ण। आहे तसे ॥**

**येणारे जाणारे। जगही ते पूर्ण। जन्मे ज्याच्यातून। त्याच्यासम॥**
**तेच प्रकटते। अनेक होऊन। कुठे उणेपण। काही नाही ॥**

**-----**

पूर्वप्रसिद्धी लोकसत्ता- डिसेंबर २०१३

# तरीही काही बाकी राहील...

वर्ष संपत आलं. वाऱ्यानं कॅलेंडरची पानं उडावीत तितक्या भुर्रकन... जिथं वस्तू, मूल्य, माणसंही बघता बघता कालबाह्य होतायत तिथं वर्षांचं काय म्हणा !... पहाटे पहाटे टेकडीवर फिरताना मनात येत होतं.. इतक्यात सूर्योदयानं लक्ष वेधून घेतलं. भवतालाला जाग येत होती. मनही टक्क जागं होतं. दिवस उजाडताना पाहणं हा रोज एक नवा अनुभव असतो...

विचारांच्या तंद्रीत टेकडी उतरताना मनात आलं.. प्रत्येक शिखरावर उताराचा अटळ आरंभबिंदू असतो.. पण लगेच असंही वाटलं, प्रत्येक पायथ्याशी वर चढत जाण्याची ओढही असतेच की! परतीच्या वाटेवर मग चढ..उतार..चढ, आरंभ..शेवट..आरंभ, जन्म...मरण...जन्म यांचं चक्राकार फिरत राहणं या विषयीच विचार येत राहिले.. उंचावरून अनुभवलेलं उजाडणाऱ्या निसर्गाचं रूप मनात तरळत होतं. मन एका वेगळ्या उंचीवर पोचलं होतं. त्या अवस्थेत आठवत राहिली लहान-मोठ्या प्रवासातली निरीक्षणं, अंतर्मुख मनात झालेलं त्यांचं आकलन आणि नंतर झालेलं त्याचं शब्दांकन.. आठवणींशी खेळता खेळता डोळ्यांसमोर आली अगदी जवळून अनुभवलेली रात्रीची निमूट उभी असलेली झाडं आणि त्यांच्या आतली खळबळ... तशी रोजच सकाळ –

संध्याकाळ फिरताना निरखत असते मी झाडांचं उभ्या उभ्या जगणं. सहअनुभूतीनं जाणू बघत असते त्यांचे अंतरंग व्यवहार.. त्या दिवशी अशीच फिरून आल्यावर मनातली आवर्तनं उतरवून ठेवली होती शब्दात. कितीतरी वर्षांपूर्वीची ती पूर्ण कविता आठवली मला...



"काळी पडत जातात झाडं
रात्र व्हायला लागली की
बुडून रहातात तशीच
लख्ख अंधारात अंतर्बाह्य !
दिवे लावून विस्कटत नाहीत अंधाराचे थर
स्वच्छ भोगतात कोलाहल
आपल्या प्रवाही खोडातले-
जमिनीखालचे
आणि पानापानांत अडकलेल्या
आपल्या आकाशातले!
अनुभवतात स्वतःचे झाड असणे
थेंब थेंब वाढत जाणे..
भोगून झाला अंधार पुरेसा की उजाडतेच
मग ती हळूहळू पुन्हा हिरवी होतात
चमकू लागतात
कालच्या पेक्षा आज थोडे तरी वाढलो
हे समजल्यासारखी सळसळत राहतात..!"

व्वा..! स्वतःलाच दाद द्यावीशी वाटली. झाडं रात्र कशी घालवत असतील हा विचार कसा आला असेल तेव्हा मनात कोणजाणे... माणसाच्या बाबतीतही असं म्हणतात की झोपेत आपली सर्व ज्ञानेंद्रियं आणि कर्मेंद्रियं निद्राधीन असतात, श्वासाखेरीज पूर्ण ये-जा थांबलेली असते तेव्हा आपल्या शरीरात आंतरिक व्यवस्थापन होत असतं. आतली सगळी आवराआवर झाल्यावर नव्या दिवसाच्या नव्या आव्हानांना सामोरं जाण्यासाठी ताजंतवानं होऊन शरीर उठून बसतं!.. कवितेतल्या झाडांसारखी माणसं 'कालच्या पेक्षा आज थोडे तरी वाढलो' का? हे समजून घेतात की नाही कोणजाणे.. बहुधा नाहीच. पण छान आहे ना हा विचार?. खरंच आपण उठल्यावर क्षणभर तरी अंतर्मुख व्हायला हवं.. आपल्या निद्रिस्थ अवस्थेचा आपण कधी विचारच करत नाही. विचारांच्या ओघात झोपेबद्दल कुठे तरी वाचल्याचं आठवलं की झोपेला लघुमरण म्हणतात. म्हणजे आपला रोजच पुनर्जन्म होत असतो तर..! आपल्यातूनच आपला नवा जन्म..! या कल्पनेशी कितीतरी वेळ खेळत राहिलं मन..

विचारांची पाऊलवाट वळणं घेत चालली होती. त्या वाटेवरून चालता चालता परत आठवली फिरताना रोज भेटणारी झाडं... मन त्या वेळच्या अनुभवात जाऊन पोचलं- मैदानात अंतरा

अंतरावर उभ्या असलेल्या वडाच्या झाडांची पानं भराभर गळून पडत होती. गळलेल्या पानांचा खच पडला होता जमीनीवर.. त्या वाळलेल्या पानांवरून चालताना कुर कुर आवाज येत होता पानं चुरली जात असल्याचा. फिरताना तशी रोजच दिसायची झाडांची ही सगळी अवस्थांतरं.. पण त्या दिवशी जाणवलं, या गळून पडलेल्या पानांचा चुरा किती सहज सामावून जातोय जमिनीत. अंगावर पडणारं सगळं पोटात घेणाऱ्या याच जमिनीत खोलवर पसरून या झाडांची मुळं शोषत असतात जीवनरस आणि पोचवत राहतात फांद्यांपर्यंत. मग गळून पडलेल्या पानांनी जाता जाता मागे ठेवलेल्या पानगळखुणा तहानल्यासारख्या पिऊन घेतात ओठाशी आलेलं सत्व. सरसावतात नवागताच्या स्वागताला.. परतताना मनभर पसरलेला होता हा अवस्थांतराचा चक्राकार प्रवास.. घरी आल्यावर डायरीत लिहिलं होतं...

"ही जमीन नाही
कैक युगं दर शिशिरात
विमुक्तपणे गळून पडणाऱ्या पानांचे
असंख्य थर आहेत हे एकमेकांवर साचलेले..!
ओतप्रोत ताजेपणानी चमकताहेत वृक्षांवर
ती पानं नाहीत
आतील अनावर सृजनेच्छेच्या वादळात



अंतर्बाह्य ढवळून हिरवी झालेली जमीनच
ऊर्ध्वगामी होऊन सळसळते आहे वृक्षांवर..!"

ग्रेट ना? लघुमरण, आपल्यातूनच आपला जन्म.. या विचारतरंगांना बिलगून ही कविता आठवली आणि ती लिहिली त्यावेळेपेक्षा आता वेगळीच जाणवली. 'आपल्यातूनच आपला जन्म' हा भाव किती व्यापक रूपात व्यक्त झालाय इथं.. चार ओळीत सगळी उलथापालथ चित्रित झालीय.. म्हणजे गळून पडलेल्या पानांची जमीन होणं आणि त्या जमीनीचंच पुन्हा पानं होऊन सळसळणं..! मनानं लगेच निसर्गातल्या दुसऱ्या एका अशाच आवर्तनाकडे झेप घेतली... इथल्याच समुद्रांचं पाणी वाफ होऊन वर जातं आणि ढगांमधून पावसाच्या रूपात पुन्हा समुद्राच्या पाण्यात मिसळून जातं!... सगळी पानं गळून गेली म्हणून झाड कधी तसंच निष्पर्ण राहात नाही. त्याला पुन्हा पालवी फुटते. पाण्याची वाफ होत होत पूर्ण समुद्र कधी सुकून जात नाही. पावसाच्या रूपात पाणी पुन्हा त्यात सामावत राहतं. निसर्गातल्या या आवर्तनांच्या जाणिवेनं मनातल्या विचारांना सकारात्मक दिशा मिळाली..

हेच विचार बरोबर घेऊन परत घरी चालले होते. वर्षाखेर जवळ आली होती. नकळत सगळं वर्ष अधुन मधून आठवत होतं.

तिन्हीसांजेला उगीचंच कातर होतं मन तसं वर्षाखेरीसही होत असतं का? कसली हुरहुर वाटत असते मनाला? काहीतरी हातातून निसटत असल्याची? की काहीतरी करायचं राहून गेल्याची?.. मनाच्या या ‘व्याकुळ’ अवस्थेला सामोरं न जाता, असं का होतंय ते समजून न घेता, कदाचित ते टाळण्यासाठीच आपण फटाके फोडून.. जल्लोष करत.. पार्ट्या झोडत.. वर्षाखेर साजरी करतो!

वाटलं आपण आपल्यापुरतं तरी हे टाळू शकू. घरी आल्यावर त्याच अंतर्मुख आणि प्रसन्न अवस्थेत डायरी लिहायला घेतली. पूर्ण वर्षाचा आढावा घेऊन झाला.. ठरवलं होतं ते बहुतेक सर्व करता आलं होतं. राहिलेलं नव्या वर्षाच्या प्लॅनरमधे घालता येणार होतं.. पण मनात आलं आज राहिलेलं काम आपण उद्यावर सोपवतो.., या वर्षीचे राहिलेले प्लॅन्स पुढच्या वर्षाच्या डायरीत जमा होतात.. पण या आयुष्यात करायच्या राहून गेलेल्या गोष्टींचं काय होणार?.. एकदम कावरंबावरं व्हायला झालं. मनाची गाडी मग पुनर्जन्मविषयक विचारांच्या रुळांवरून धावायला लागली.. याविषयी अधून मधून बराच विचार करून झाला होता. कसाही विचार करून पाहिला तरी रूढ असलेली पुनर्जन्म कल्पना मला मान्य होत नव्हती. फार तर असं म्हणता येईल की पूर्वजन्म म्हणजे मागच्या पिढ्या आणि पुनर्जन्म म्हणजे पुढच्या पिढ्या. किंवा याच,

आपल्याच जन्मापुरतं बोलायचं तर एखादं नवं आकलन, नवी क्षमता प्राप्त होणं हाच वरच्या पायरीवर नेणारा आपला नवा जन्म. पुनर्जन्म या संकल्पनेचा आपल्यापुरता असा अर्थ लावून मी स्वस्थ होते. पण, या आयुष्यात करायच्या राहून गेलेल्या गोष्टींचं काय होणार? हा सहज मनात आलेला विचार अस्वस्थ, अंतर्मुख करणारा होता... मात्र आज सकाळपासून निसर्गाच्या सान्निद्ध्यात मिळालेल्या सकारात्मक विचारांनी एक वेगळी ऊर्जा दिलेली होती. मनात आलं आपण 'आपल्या' आयुष्याचा परीघ ओलांडून पाहिला तर?.. सृष्टीतील विविध आवर्तनांच्या विलोभनीय खेळाचा 'आस्वाद' कवितेपुरता न ठेवता तो आपल्या प्रत्यक्ष जगण्यातील विचारांचा भाग बनेल का? एका व्यापक परिघाचा विचार करता येईल का?.. पानगळ..बहर.., दिवस..रात्र.. काहीच कायमचं नाही. प्रत्येक आरंभाला शेवट आहे तसा प्रत्येक शेवटातून आरंभ आहे..

या विचारांना आधार देणारी फार पूर्वी वाचलेली 'यिन-यांग'वर्तुळ ही चिनी संकल्पना आठवली. काळं-पांढरं, सृजन-विनाश या द्वैताचं एक वर्तुळाकार चिन्ह! सृजनाच्या अर्ध्या भागात विनाशाचं एक सूक्ष्म बीज असतं. आणि विनाशाच्या अर्ध्या भागात सृजनाचं..! एक अवस्था पूर्णत्वाला गेली की दुसऱ्या

अवस्थेची सुरवात होते. दिवस मावळत मावळत अंधार घनगर्द झाला की उजाडण्याच्या प्रक्रियेला सुरुवात होते.. हा आपलाही अनुभव असतोच की!

एका मागून एक करत मनात असंख्य विचार तरंग उमटत होते.. मग आयुष्यातले अनेक खचवणारे प्रसंगही आठवत गेले. त्यावेळी वाटलं होतं की संपलं सगळं. पण नाही. उभं राहता आलं नव्या दमानं पुन्हा. राखेतून नवा जन्म घेऊन उभ्या राहिलेल्या माणसांची कितीतरी उदाहरणं सुद्धा पाठोपाठ आठवत गेली... अंतर्मुख अवस्थेत वाटून गेलं की व्यक्ती 'मी'ला पुनर्जन्म खरंच असेल किंवा नसेलही पण ही कल्पना स्वीकारली तर, आज राहिलेलं काम उद्या लवकर उठून करू म्हणून निवांत झोपता येतं तसं या जन्मात साकारायची राहिलेली स्वप्नं पुढल्या नव्या जन्मात साकारता येतील असं म्हणून मृत्युलाही निवांतपणे सामोरं जाता येईल..! असा दिलासा देण्यासाठीच योजली असेल का ही कल्पना कुण्या विचारवंतांनी?.. विचारांशी खेळता खेळता त्या कल्पनेतलं काव्य उमगलं..! एका वेगळ्या समाधानात मी डायरी बंद केली. डोळे मिटले. वाटलं आज मी काहीतरी मौल्यवान कमावलंय..!

पण विस्तारलेल्या जाणिवेला त्या समाधानात दिसलं एक प्रश्नचिन्ह... आपण वर्षानुवर्षे अनुभवत असतो की रात्री नंतर

दिवस येतो तसा वर्षाखेरीनंतर वर्षारंभ येतो. पुनर्जन्म संकल्पना असं मानायला जागा ठेवते की एका जन्मानंतर दुसरा जन्म असू शकतो. किंवा जीवनसातत्य टिकलेलं तर अनुभवतोच आपण... पण या एकूण एक अस्तित्वाच्या अंतानंतर काय असेल? असेल का काही? व्याकूळ करणारा प्रश्न मनात उमटला आणि पाठोपाठ आठवली आलिकडेच अनुवाद केलेली डॉ. विश्वनाथ प्रसाद तिवारी यांची एक कविता, 'तरीही काही बाकी राहील' म्हणत या प्रश्नाला आश्वासक उत्तर देणारी!... वर्षाखेर साजरी करताना या कवितेचा आशय सोबत घेण्यासारखा आहे...

"चिता पेटली आहे
आणि जळतं आहे स्मशान
पण मी तुम्हाला सांगतो
तरीही काही बाकी राहील
काय राहील
हे मला माहीत नाही
किती राहील
याचा अंदाज तुम्ही स्वतः करा
का राहील
हा एक निरर्थक प्रश्न आहे
मी फक्त इतकंच जाणतो
की काही तरी राहील...

तुम्हाला खात्री आहे काय
की जगण्याच्या इच्छा मरून जातील
झरून जातील श्रद्धा
सुकून जातील स्वप्नं
व्यर्थ होऊन जातील शब्द...
तुम्हाला खात्री आहे काय
की आग सगळं काही जाळून टाकू शकते
सगळं काही सुकवू शकते हवा
पाणी सगळं काही विरघळवू शकतं
सर्व काही नष्ट करू शकतं ब्रह्मास्त्र ?
नाही, निश्चित काही बाकी राहील
कुठे आणि कसं आणि किती ?
हे तर तेच सांगेल
जे राहील..!”

--------

पूर्वप्रसिद्धी: लोकसत्ता- डिसेंबर २०१२



# नव्या संकल्पाची ती आठवण...

“नमस्कार..

नवीन वर्षाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा..!”

सकाळी फिरण्याच्या ट्रॅकवर समोरून येणाऱ्या मैत्रिणीनं हातात हात घेत दिलखुलास हसत म्हटलं... मीही नकळत तसाच उत्तेजित प्रतिसाद दिला. तिचा उत्साह माझ्यात संक्रमित झाला होता... पावलं अधिक जोमानं पडायला लागली. घरातून निघताना बरोबर आलेली मरगळ तिथेच गळून पडली. ती स्वतःशी बोलल्यासाखी म्हणाली, नव्या वर्षासाठी मी एक नवा संकल्प केलाय. तू काय ठरवलंयस?...

ही तशी अतीरूढ झालेली, जवळपास प्रत्येकाच्या अनुभवाला येणारी अगदी सामान्य घटना... पण दर वर्षी मला ती आठवते. एखाद्या स्वादिष्ट पदार्थाची चव जिभेवर रेंगाळावी तशी

ही आठवण मी मनात रेंगाळत ठेवलीय... कारण मरगळ झटकून ऊर्जा संक्रमित करणारा ‘नवे वर्ष नवा संकल्प..’ हा मंत्र तिनं मला दिला होता.. त्या दिवशी घरी परतताना मीही नव्या संकल्पाविषयी विचार करायला लागले होते.. खरंच नवं काहीतरी घडतंय.. घडायला हवंय असं मला वाटायला लागलं होतं. मी त्या दिशेनं चालायला लागले होते...!

खरंतर नववर्षाच्या स्वागतासाठी रात्री बारा वाजता वाजवल्या जाणाऱ्या फटाक्यांच्या आवाजानं झोपमोड होते. मग रस्त्यातून जल्लोष करत हिंडणाऱ्यांविषयी चीड निर्माण होते.. आणि ‘दिवसेंदिवस हे वाढतंच चाललंय..’ हा तक्रारीचा सूर पार वरचा सा गाठतो.. मग राहिलेल्या रात्रीच्या झोपेचं खोबरं होतं. आणि नव्या वर्षाचं स्वागत त्रासिक चेहऱ्यानं केलं जातं. मनात येत राहातं, कुठल्याही ‘काल’च्या दिवसानंतर उगवणाऱ्या ‘आज’सारखाच तर असतो एक जानेवारीचा दिवस. त्याचं काय एवढं स्तोम माजवायचं? पण नव्या संकल्पाची ती आठवण जवळ येते आणि कपाळावरच्या आठ्यांमधल्या या प्रश्नाला गप्प करते...

तसं तर रोजचं जगणं हे स्तोम माजवणंच तर असतं. काय अर्थ असतो अब्जावधींच्या संख्येतली एक व्यक्ती म्हणून जगण्याला? पृथ्वीच्या गोलाचा नकाशा पाहायला लागलं की हे वैयर्थ गडद

होतं. आणि खगोलाचा पट डोळ्यांसमोर आणला तर त्या असीमातल्या ब्लॅकहोलमधे नाहीसेच होतो आपण... नगण्यतेला काही सीमाच उरत नाही... पण हे जाणवून देणारे अस्तित्वभान तर जागे असते... मग असीमाचे ओझे उतरवून साजरा करावा लागतो आपल्या इटुकल्या अस्तित्वाचा उत्सव.. संकल्पाचा मंत्र आठवावा लागतो पुन्हा पुन्हा...

भोवतीच्या उन्मादांच्या तळाशी असलेलं बकाल वास्तवही झाकलेलं राहात नाही कितीही आतषबाजी केली तरी.. काही सेकंदांच्या झगमगाटानंतर खाली उरणाऱ्या राखेसारखं... हवेत मुरलेल्या दुर्गंधीसारखं ते जाणिवेला कुरतडत राहातं. अस्वस्थ करतं... 'स्व'च्या मर्यादा आणि छोट्या छोट्या स्वार्थांचे चिवट मोहही असतातच संकल्पपूर्तीच्या वाटेवर पाय मागे ओढायला... धरलेली उमेद क्षीण व्हायला अशी कैक निमित्तं भेटत राहतात...

नव्या वर्षाचं निमित्त साधून नवी ऊर्जा घेऊन येणारी नव्या संकल्पाची ती आठवण म्हणूनच मी निकरानं जतन करून ठेवलीय..!

-----

पूर्वप्रसिद्धी- 'सकाळ' पहाट पावलं सदर २०१८

# समारोप नसतोच...



आमच्या कुंडीत आपसुक रुजून एक रोप तरारून वर आलं. कितीतरी दिवस झाले त्याची गर्द हिरवी लांबसडक पानं कारंज्यासारखी उसळून उमललेली राहिलीयत आणि ऋतुनुसार त्या रोपाला हळदीसारख्या पिवळ्या रंगाची फुलं येतायत. रोप अजून टिकून आहे आणि त्याला सातत्यानं फुलं येतायत त्या अर्थी केव्हातरी, कुठूनतरी बीज पडलं असेल. उगवण्याच्या आंतरिक ऊर्मीला कुंडीतल्या तयार मातीनं साथ दिली असेल आणि सुरू झाला असेल सृजन-सोहळा...! हा सोहळा मी कित्येकदा अनुभवलाय. परिपक्व क्षणी देठातून कळी डोकावते. बघता बघता त्याचं फूल होतं. रंग उधळत पाकळ्या पसरवून हसतं आणि परतीची हाक येताच स्वतःला मिटून घेतं. निर्माल्य होऊन गळून पडतं. तोवर दुसरी कळी डोकवते.. फुलते..

हसते.. गळून पडते.. एक फूल गळून पडलं तरी लगेच बहर संपत नाही. एक बहर संपला तरी शिशिर पचवून नवा बहर झाडांवर दाखल होतो. रुजणं.. उमलणं.. गळून पडणं.. पुन्हा रुजणं.. हे चक्राकार गतीनं अखंड चालूच असतं. सृजनाच्या या खेळाला समारोप असत नाही.. हे अनुभवताना मला “उपजे ते नाशे। नाशले पुनरपि दिसे। हे घटिकायंत्र तैसे। परिभ्रमे गा” या ज्ञानेश्वरीतल्या ओवीचा आशयच दृश्यमान झाल्यासारखा वाटला..!

आपल्या भोवतीही सर्वत्र दिसतं की भौतिक परिवर्तनाच्या रेट्यात जुनं सगळं भराभर मागं पडतंय. पण जीवन-प्रवाह थांबलेला नाहीए. जुन्या चालीरीती, कपडे, दागिने, खाण्याच्या सवयी, सामाजिक नीती नियम, राजवटी, अर्थाजनाची साधनं, कुटुंबव्यवस्था, साहित्य, विविध कला, भाषा... सर्व वेगानं बदलत असलं तरी नाहीसं झालेलं नाहीए. त्याच जमिनीतून नव्या रूपात निर्माण होत राहिलंय. बाह्य परिवर्तनाच्या सर्व आघातांना टक्कर देत जीवन-प्रवाह अखंड चालूच आहे. सानुल्या फुलापासून महाकाय ग्रह-ताऱ्यांपर्यंत सर्व पातळ्यांवर ‘उत्पत्ती.. स्थिती.. विलय.. उत्पत्ती’ यांची असंख्य आवर्तनं आपापल्या गतीनं चालू आहेत...

रात्रीचा अंधार शिगेला पोचला की उतरणीला लागतो. हळूहळू उजाडू लागतं. क्षितिज ओलांडून सूर्य वर येतो. उन्हं तापून

थकतात. मग सूर्य आपली किरणं आवरून पुन्हा क्षितिजामागे बुडी मारतो. उजेडाची ही भरती ओहोटी पाहणारा दिवस रोज नाव बदलून आपल्याला भेटत असतो. दिवसांमगून दिवस जातात. बघता बघाता वर्ष संपत येते. पण ते संपण्याचा क्षण सुटा, एकाकी असत नाही. त्याला बिलगून नव्या आरंभाचा क्षण उभा असतो. हे सगळे क्षण.. दिवस.. महिने जगणारे आपण अदृश्य अशा मध्यसीमेवरून सरत्या क्षणाला निरोप देतो आणि नवागताचे स्वागत करतो. सृष्टीच्या 'घटिकायंत्रा'चा आपणही एक अविभाज्य भाग असतो. पण आपली जाणीव आपल्याला माणूस म्हणून वेगळं करते. चक्रात राहून आपण त्या चक्राकडे पाहात असतो. चक्रासोबत फिरता फिरता एका हाताने जाणाऱ्या क्षणाला.. म्हणजे खरंतर आपल्यालाच निरोप देतो आणि दुसऱ्या हाताने येणाऱ्या क्षणाचे.. म्हणजे खरंतर आपलेच स्वागत करत असतो... या निरोप-स्वागताच्या सोहळयामधे जाणीवपूर्वक सहभागी होता आलं तर खऱ्या अर्थानं आपल्यातल्या जुन्याला निरोप देता येईल आणि नव्याचे दिलखुलास स्वागत करता येईल..!

-----

पूर्वप्रसिद्धी- 'सकाळ' पहाट पावलं सदर २०१८


## आसावरी काकडे यांची ई साहित्यवरील इतर ४ पुस्तके


## कव्हरवर एकच क्लिक केले की पुस्तक उघडेल









## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष
## आसावरी काकडे यांचे ईसाहित्यवर हे पाचवे पुस्तक.

आसावरी काकडे हे नाव माहित नाही असा कोणी मराठी वाचक नसेल. इयत्ता सातवी ते MA अभ्यासक्रमात त्यांच्या कवितांचा अभ्यास करून नवीन पिढी मोठी होत आहे. आधीच्या पिढीनेही अनेक पुस्तकांतून आणि कार्यक्रमांतून त्यांच्या काव्याचा आस्वाद आणि विचारांचा परिचय घेतला आहे. त्यांच्या पुस्तकांना मानधनासहित प्रकाशित करण्यासाठी प्रकाशकांची अहमहमिका असते. परंतू त्यांनी या पुस्तकांसाठी ई साहित्यचा मार्ग अनुसरला व वाचकांना विनामूल्य वाचनानंद द्यायचा निर्णय घेतला. एकाही पैशाची अपेक्षा न ठेवता त्यांनी उदार हस्ते ही पुस्तके आमच्या लाखो वाचकांना दिली.

असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३४), अनील वाकणकर

(९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (११), अंकुश शिंगाडे(१९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(४) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(५), श्याम कुलकर्णी, किशोर कुलकर्णी, रामदास खरे, अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, वैजयंती डांगे, अशोक तपासे, सतीश बेंडीगिरी, रामदास खरे असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक

मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।